TARUN BHARAT

PAGE 7

19.12.2012

शिपयार्डतर्फे एमईएसला 'वॉटर कुलर' प्रदान

▶ वास्को / प्रतिनिधी

गोवा शिपयार्ड आस्थापनातर्फे एमईएस उच्च माध्यमिक विद्यालयाला वॉटर कुलर आणि वॉटर प्युरिफायर भेट देण्यात आले.

या प्रसंगी गोवा शिपयार्डच्या व्यावसायिक विभागाचे प्रमुख एन. के. कुलकर्णी, डॉ. एन. एम. जबंगी, प्राचार्या मेलिता क्वार्दोज, पालक शिक्षक संघाच्या अध्यक्षा डॉ. शुभांगी लोटलीकर तसेच इतर पदाधिकारी, शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पालक-शिक्षक संघाच्या सचिव रजनी गोळवळकर यांनी आभार मानले.